Sakal : 04/07/10

# 'प्रिसिजन'चे नवे मनुष्यबळ धोरण

## यतीन शहा : 'ग्रेट प्लेस टू वर्क' मानांकनाकडे वाटचाल सुरू

सकाळ वृत्तसेवा

सोलापूर, ता. ३ : प्रिसिजन कंपनीने 'ऑर्बिट २०१३' मोहिमेच्या आधारे नवे मनुष्यबळ धोरण कंपनीने आखले असून २०१३ पर्यंत जगातल्या मान्यवर अशा 'बेस्ट प्लेस टू वर्क' ह्या श्रेणीत प्रिसिजन कंपनी असावी यासाठी ही विशेष मोहीम आखल्याची माहिती व्यवस्थापकीय संचालक यतीन शहा यांनी आज पत्रकारांना दिली.

श्री शहा म्हणाले, "या मोहिमेंतर्गत 'प्रिसिजन'च्या कार्य संस्कृतीशी कर्मचाऱ्यांची एकरूपता, त्यांचे प्रशिक्षण व विकास, त्यांच्या नेतृत्वगुणांना वाव, त्यांच्या कामाचे निःपक्ष मूल्यांकन, बक्षीस व प्रोत्साहन योजना अशा अनेक उपक्रमांचा यात समावेश आहे. कर्मचाऱ्यांसाठी निरंतर प्रशिक्षणाची व्यवस्था निर्माण केली जाईल. कामाशी संबंधित चर्चासत्रे, प्रशिक्षण कार्यक्रम, गुणवत्ता व्यवस्थापनात कर्मचाऱ्यांचा पुढाकार, तसेच एक संवेदनशील नागरिक म्हणून कर्मचाऱ्यांची ओळख निर्माण करणे आदी उपक्रम आहेत. 'प्रिसिजन'चा प्रत्येक कर्मचारी हा 'ब्रँड ॲम्बॅसिडर' असेल, असा प्रयत्न राहणार आहे."

कॅमशाफ्टस उत्पादनात जगात प्रथम क्रमांकावर येण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे. जगातल्या सर्व वाहन उत्पादकांना याचा पुरवठा झाला तर २०१५ पर्यंत कंपनीची वार्षिक उलाढाल एक हजार कोटी रुपयांपर्यंत जाईल, म्हणजे खऱ्या अर्थाने 'ऑर्बिट २०१३' मुळे 'प्रिसिजन'च्या कार्यकक्षा रुंदावतील, असे श्री. शहा यांनी सांगितले.




'प्रिसिजन'चे व्यवस्थापकीय संचालक यतीन शहा व डॉ. सुहासिनी शहा.

'ग्रेट प्लेस टू वर्क' हे मानांकन ध्येय गाठले म्हणजे जागतिक पातळीवर काम करण्यासाठी सर्वोत्तम ठिकाण 'प्रिसिजन' असणार आहे. असे मानांकन मिळविणाऱ्या जगात काही मोजक्याच कंपन्या आहेत.

सोलापूरच्या औद्योगिक वाटचालीतही या 'ऑर्बिट २०१३' मोहिमेचे महत्त्व आहे. जागतिक पातळीवरील 'ग्रेट प्लेस टू वर्क' मानांकन असणारी कंपनी सोलापुरात आहे, याचा स्वाभाविक परिणाम सोलापूरची औद्योगिक प्रतिमा उंचावण्यात होणार आहे. सोलापूरच्या कामगारांच्या गुणवत्तेला जागतिक मान्यता प्राप्त होईल. साहजिक उद्योगवाढीलाही संधी आहे. या पत्रकार परिषदेला डॉ. सुहासिनी शहा, आर. आर. जोशी, अशोक खन्ना, आर. के. काशीद, अभिजित जैन, माधव देशपांडे, अमोल गोडबोले, संजीव माळवदकर हे कंपनीतील उच्च अधिकारी उपस्थित होते.

Samana : 04/07/10

## कामगारांच्या गुणवत्तेला जागतिक मान्यतेसाठी

# 'प्रिसिजन'चे नवीन मनुष्यबळ धोरण

## - यतीन शहा

सोलापूर, दि. ३ (प्रतिनिधी) - सोलापूरच्या कामगारांच्या गुणवत्तेला जागतिक मान्यता प्राप्त होण्याच्या दृष्टीने 'प्रिसिजन कॅमशॉफ्ट ऑर्बिट-२०१३' हे नवे मुनष्यबळ धोरण राबवित असल्याची माहिती प्रिसिजनचे व्यवस्थापकीय संचालक यतीन शहा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

प्रिसिजन कॅमशाफ्ट्स लिमिटेडने आजपर्यंतच्या वाटचालीत अत्याधुनिक तंत्रज्ञान, चांगल्या उत्पादन सुविधा उभ्या करून देशातल्या आणि जगातल्या प्रमुख वाहन उत्पादकांना समाधानी करण्यात यश मिळविले आहे. आता 'मनुष्यबळ विकासा'ला कंपनीने प्राधान्य दिले आहे. त्यासाठी प्रिसिजनने 'ऑर्बिट - २०१३' ही विशेष मोहीम राबविण्याचे हाती घेतले असल्याचे सांगून यतीन शहा म्हणाले, त्यानुसार सन २०१३ पर्यंत, जगातल्या मान्यवर अशा 'बेस्ट लिस टू वर्क' या श्रेणीत जाऊन बसण्याचे प्रिसिननचे उद्दिष्ट आहे.

'ऑर्बिट - २०१३' या विशेष मोहिमेबद्दलची माहिती देताना यतीश शहा म्हणाले, रिक्रुटमेंटपासून रिटायरमेंटपर्यंत कंपनीतला आपला प्रवास कसा असणार, कशा पद्धतीने काम करावे लागणार याची रूपरेषा त्याला या पद्धतीतून स्पष्ट होणार आहे. याकरिता कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र पोर्टल विकसित केले जाणार आहे. काम सोडून जाणाऱ्यांचे प्रमाण केवळ ५ टक्के राहील, असा प्रयत्न आहे. काम सोडून जाणारा कर्मचारी ब्रँड ॲम्बेसिडर' म्हणून बाहेर पडावा असा कंपनीला प्रयत्न राहणार आहे. यासाठी कार्मचाऱ्याच्या भरती प्रक्रियेपासून सगळ्या कार्यपद्धतीत बदल केले जाणार आहेत. प्रिसिजनची कार्यसंस्कृती, कर्मचाऱ्यांची एकरूपता, कर्मचारी प्रशिक्षण व विकास, त्यांच्या नेतृत्वगुणांना वाव, कामाचे निःपक्ष मूल्यांकन, बक्षीस व प्रोत्साहन योजना, असे अनेक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. कर्मचाऱ्यांसाठी निरंतर प्रशिक्षण, कामाशी संबंधित चर्चासत्रे, प्रशिक्षण कार्यक्रम असे विविध कार्यक्रम राबवून आनंदी आणि अभिमानी कर्मचारी वर्ग निर्माण करण्याचा प्रयत्न आहे.

'प्रिसिजन' सध्या जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे. सन २०१५ पर्यंत जगात सगळ्याच वाहन उत्पादकांना कॅमशाफ्ट पुरवठा करून कंपनीची उलाढाल एक हजार कोटीपर्यंत नेण्याचा प्रयत्न आहे. जागतिक पातळीवर काम करण्यासाठी 'ग्रेट प्लेस टू वर्क' हे मानांकन दिले जाते. हे मानांकन असणाऱ्या जगात मोजक्याच कंपन्या आहेत. अशा मोजक्या कंपन्यांमध्ये प्रिसिजनचा समावेश होण्यासाठी 'ऑर्बिट २०१३' हे नवे मनुष्यबळ धोरण राबविण्यात येणार आहे, 'ग्रेट प्लेस टू वर्क' या मानांकनामुळे सोलापूरच्या कामगारांच्या गुणवत्तेला जागतिक मान्यता प्राप्त होईल. त्यामुळे सोलापुरात बाहेरून येऊन उद्योग सुरू होण्याचा कल वाढू शकतो. सोलापूरच्या दृष्टीने ऑर्बिट २०१३ ही मोहीम एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असल्याचे यतीन शहा यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेत डॉ. सुहासिनी वाघ, आर. आर. जोशी, अशोक खन्ना, आर. के. काशिद, अमोल गोडबोले, संजीव माळवदकर, अभिजित जैन, माधव देशपांडे उपस्थित होते.

Sanchar : 04/07/10

# 'ऑर्बिट २०१३' : प्रिसीजनचे नवे मनुष्यबळ धोरण

## ❑ 'ग्रेट प्लेस टू वर्क' मानांकनासाठी प्रयत्न : शहा ❑

**सोलापूर, दि. ३ (प्रतिनिधी)- 'मनुष्यबळ विकास' हा प्रमुख उद्देश डोळ्यासमोर ठेवून प्रिसीजन कॅमशाफ्टस् लिमिटेड कंपनीने 'ऑर्बिट २०१३' ही विशेष मोहीम हाती घेतली असून या मोहिमेअंतर्गत सन २०१३ पर्यंत जगभरातील मान्यवर अशा 'ग्रेट प्लेस टू वर्क' या श्रेणीमध्ये जावून बसण्याचे उद्दिष्ट प्रिसीजनने ठेवले असल्याची माहिती प्रिसीजनचे व्यवस्थापकीय संचालक यतीन शहा यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली.**

'ऑर्बिट २०१३' या विषयी अधिक माहिती देताना शहा म्हणाले की, या मोहिमेअंतर्गत कर्मचाऱ्यांच्या भरतीप्रक्रियेपासून ते अन्य सर्व पध्दतीमध्ये बदल केला जाणार आहे. प्रिसीजनच्या कार्यसंस्कृतीशी कर्मचाऱ्यांची एकरुपता, कर्मचारी प्रशिक्षण व विकास, नेतृत्वगुणांना वाव, कामांचे मूल्यांकन तसेच कर्मचाऱ्यासाठीच्या बक्षीस व प्रोत्साहन योजनांचा यामध्ये समावेश आहे. कर्मचाऱ्यांसाठी निरंतर प्रशिक्षणाची व्यवस्था निर्माण करण्यात येणार आहे. कामासंदर्भातील चर्चासत्रे, प्रशिक्षण, गुणवत्ता व्यवस्थापनामध्ये कर्मचाऱ्यांचा पुढाकार याशिवाय नामांकित विद्यापीठाशी संलग्न राहून कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण व प्रमाणपत्र देणे, कर्मचाऱ्यांचाही सामाजिक पुढाकार वाढविणे तसेच एक संवेदनशील नागरिक म्हणून त्यांची ओळख निर्माण करणे हा यामागचा प्रमुख उद्देश आहे.

आगामी २०१३ सालापर्यंत काम सोडून जाणाऱ्या कर्मचाऱ्यांचे प्रमाण केवळ ५ टक्के इतकेच राहील. यासाठी प्रयत्न केले जाणार आहे. काम सोडतानाची प्रक्रियादेखील निर्धारित केली जाईल. काम सोडणारा कर्मचारी आमचा ब्रँड ॲम्बेसिडर म्हणून बाहेर पडावा. असा आमचा प्रयत्न राहणार आहे. या सर्व प्रयत्नातून सन २०१३ पर्यंत आमच्याकडे ७० टक्के कर्मचारी समाधानी असतील तसेच कॅमशॉफ्ट उत्पादनात आम्ही जगामध्ये प्रथम क्रमांकावर असू याशिवाय सन २०१५ सालापर्यंत कंपनीची वार्षिक उलाढाल १००० कोटी रुपयापर्यंत जाईल. असा विश्वासही शहा यांनी व्यक्त केला.



प्रिसीजनच्या मोहिमेविषयी पत्रकार परिषदेत माहिती देताना यतीन शहा आणि डॉ. सुहासिनी शहा.

ग्रेट प्लेस टू वर्क हे मानांकन मिळविण्यासाठी एका स्वतंत्र यंत्रणेकडून निष्पक्ष पध्दतीने ऑडीट करण्यात येते. त्यानंतरच खऱ्या अर्थाने हे मानांकन दिले जाते. जागतिक पातळीवर काम करण्यासाठी सर्वोत्तम ठिकाण बनण्याचे ध्येय प्रिसीजनने ठेवले आहे. हे मानांकन असलेल्या जगभरात मोजक्याच कंपन्या आहेत. अशा मोजक्याच कंपन्यामध्ये प्रिसीजनचा समावेश करण्यासाठी ऑर्बिट २०१३ ही मोहीम राबविण्यात येणार आहे. त्यासाठी नाईथ वे मॅनेजमेंट कन्सल्टन्सी या संस्थेचे सहकार्य घेण्यात येणार आहे. प्रिसिजनचे हे ध्येय आणि उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ग्राहकांना प्राधान्य. उत्कृष्टतेचा ध्यास, सर्वांबद्दल आदर, चपळता, तत्परता, संघभावना, उद्योजकता या पाच आधारस्तंभावरच प्रिसिजनची वाटचाल अवलंबून असणार असेही शहा यांनी यावेळी बोलताना सांगितले.

या पत्रकार परिषदेला डॉ. सुहासिनी शहा, आर. आर. जोशी, अशोक खण्णा, आर. के. काशीद, माधव देशपांडे उपस्थित होते.